नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १४/०६/२०२५ (शनिवार)**

---

# एम. आय. डी. सी. बोरी पोलीस स्टेशन हद्दीतील रेकॉर्ड वरील गुन्हेगार मुकेश किसन देवगडे याला केले हद्पार

**महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ५६ (१) (ब) अन्वये उपविभागिय दंडाधिकारी, नागपुर ग्रामीण यांनी मुकेश किसन देवगडे ,वय ३५ वर्षे, सालईदाभा ,ता. हिंगणा,जि नागपुर याला हद्पार केले.**

नमुद आरोपीवर अतिक्रमण करणे, धमकावने, अश्लिल शिवीगाळ करणे, अवैध रित्या दारू बाळगुन विक्री करणे या सारखे गुन्हे दाखल असुन त्याचे गुन्हेगारी कृत्यांवर नियंत्रण ठेवण्या करीता वेळोवेळी पोलीसांनी त्याचेवर प्रतिबंधक कार्यवाही सुध्दा केली आहे. परंतु आरोपी याने आपली गुन्हेगारी गतिविधी निरंतर सुरूच ठेवली. सदर आरोपी असे गुन्हे करण्याच्या सवईचा असल्याने तो अशा प्रकारचे गुन्हे करून सामान्य जनतेच्या मनात दहशत पसरवितो तसेच त्याच्या कृत्यामुळे शांततेचा भंग होवुन कायदा व सुव्यवस्थेचा प्रशन निर्माण होण्याची दाट शक्यता असल्यामुळे सदर आरोपींचा **महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ५६ (१) (ब) अन्वये हद्पार** करण्याचा प्रस्ताव एमआयडीसी बोरी पोलीसांनी **उपविभागिय दंडाधिकारी, नागपुर ग्रामीण यांचे कडे पाठविला असता त्यांनी प्रस्ताव मंजुर करून आरोपी नामे मुकेश किसन देवगडे ,वय ३५**

वर्षे, सालईदाभा , ता. हिंगणा, जि. नागपुर याला  दिनांक १३/०६/२०२५ रोजी पासुन १ महीन्या करीता नागपुर शहर आणि नागपुर ग्रामीण येथुन हद्दपार केले आहे.

नमुद इसमास एम.आय.डी.सी. बोरी पोलसांनी नागपुर जिल्हयांच्या बाहेर सोडले असुन नमुद इसम नागपुर जिल्हयाच्या हद्दीत दिसुन आल्यास तात्काळ पोलीस स्टेशन एम.आय.डी.सी बोरी  किंवा नजिकचे पोलीस स्टेशनला माहीती दयावी.



आरोपी नामे मुकेश किसन देवगडे

# खुन करणाऱ्या आरोपी विरूध्द गुन्हा नोंद करून खापा पोलीसांनी आरोपीला केले अटक

**पोलीस स्टेशन खापा** :— सदर गुन्हा खापा पोलीस स्टेशन अंतर्गत मौजा खेडी , ता. सावनेर जि. नागपुर येथे दिनांक ०९/०६/२०२५ चे सकाळी ०९/०० ते ०९/३० वा.दरम्यान घडला आहे.यातील फिर्यादी नामे सुनिता वासुदेव वासनिक, वय ४५ वर्षे ,रा. खेडी , ता. सावनेर, जि. यांनी पोलीस स्टेशन खापा येथे रिपोर्ट दिली की, त्यांच्या घराशेजारी राहणारी महीला आरोपी आणि फिर्यादीच्या कुटुंबात दोघांच्या घराच्या मधोमध असलेल्या जागेच्या मालकी हक्काबाबत वाद आहे. सदर वाद सोडविण्यासाठी फिर्यादीच्या कुटुंबीयांनी दिनांक ०९/०६/२०२५ रोजी ग्रामपंचायत आजनी यांच्याकडुन वादग्रस्त जागेची कायदेशीर मोजणी करून घेतली. परंतु ती मोजणी आरोपी महीलेला मान्य नसल्याने तिने फिर्यादीच्या कुटुंबीयांना शिवीगाळ करणे सुरू केले. त्यामुळे फिर्यादी ची सासु **मृतक नामे लिलाबाई नत्थुजी वासनिक,** वय ८० वर्षे या आरोपी महीलेस शिवीगाळ करू नको असे समजाविण्यासाठी गेल्या असता आरोपी महीलेने मृतक यांना जाणीवपुवर्क जोंरात ढकलुन दिल्याने मृतक या जमीनीवर पडल्या. त्यात त्यांच्या डोक्याला आणि उजव्या पायाला दुखापत झाली. त्यांना उपचाराकामी प्राथमिक आरोग्य केंद्र येथे नेले होते. नमुद महीला आरोपीने ढकलुन दिल्याने मार लागल्याने दिनांक १०/०६/२०२५ रोजी मृतक नामे लिलाबाई नत्थुजी वासनिक, वय ८० वर्षे या मरण पावल्या. अशा फिर्यादीच्या तोंडी रिपोर्ट वरून दिनांक १४/०६/२०२५ रोजी पोलीस स्टेशन खापा येथे कलम १०३ भारतीय न्याय संहीता अन्वये खुनाचा गुन्हा नोंद आहे.

**सदर गुन्हयातील महीला आरोपीला खापा पोलीसांनी अटक केली आहे.**

# अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या ७ आरोपीतांविरूध्द एन.डी.पी.एस कायदयान्वये ७ गुन्हे नोंद

**पोलीस स्टेशन देवलापार** :— नागपुर ग्रामीण जिल्हयाअंतर्गत देवलापार पोलीसांनी अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या ७ आरोपीतांविरूध्द कारवाई करून ७ गुन्हें नोंद केले आहे. पोलीस स्टेशन देवलापार अंतर्गत दिनांक १४/०६/२०२५ रोजी पोलीस मोरफाटा दर्गा उर्स बंदोबस्त दरम्याण पेट्रोलींग करीत असतांना मौज मोरफाटा दर्गाचे मागे आरोपी क्रं १) **मोहम्मद सलीम मोहम्मद अफजल अंसारी, वय २४ वर्ष, रा. कामठी गोल्ड बाजार मैदान कामठी जि.नागपूर** , आरोपी क्र. २) **नामे रोशन रमेश भजने वय २१ वर्ष, रा. माकडे नगर तुमसर जि. भंडारा** आरोपी क्रं ३) नामे **दिक्षांत महेंद्र वासनीक, वय १९ वर्ष, रा. सितेपार खैरलांजी ता.तुमसर जि.भंडारा** आरोपी क्रं ४) नामे **शेख शारूख शेख सलीम, वय २९ वर्ष, रा. मोमीनपुरा ईदगहा, आंबेडकर भवन चे जवळ नागपूर जि.नागपूर** आरोपी क्रं ५) नामे **शेख शारूख शेख रफीक, वय २४ वर्ष, रा.मोमीनपुरा, डोबीनगर आंबेडकर भवन चे जवळ नागपूर जि.नागपूर** आरोपी क्रं ६) नामे **मोहम्मद सुफीयान मोहम्मद अब्दुल रशीद, वय २२ वर्ष, रा. मोमीनपुरा ईदगाह आंबेडकर भवन चे जवळ नागपूर जि.नागपूर** आणि आरोपी क्रमांक ७) नामे **शेख सलमान शेख अहमद, वय २५ वर्ष, रा.मोमीनपुरा अन्सासनगर,नागपूर जि. नागपूर** हे आरोपी मौजा मोरफाटा दर्गा चे मागे चिल्लम मध्ये गांजा पितांना मिळुन आले.

**नमुद ७ आरोपतांवर पोलीस स्टेशन देवलापार येथे** कलम २७ एन.डी.पी.एस. कायदयान्वये ७ गुन्हें नोंद करण्यात आले आहे.

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने